follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २९४ सातारा * शनिवार दि २० जुलै २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# वाघनखं प्रदर्शन उद्घाटनाचा भव्य सोहळा

## मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती






**सातारा :** शिवकालीन वाघनखे राजधानी साताऱ्यात आली हा राजधानी सातारा आणि महाराष्ट्राच्या दृष्टीने भाग्यचा दिवस आहे .शिवरायांनी अफजलखान संपवला ती वाघनखे ही महाराष्ट्राची शान आहे .आजचा दिवस खरोखर प्रेरणादायी आहे मात्र विरोधी पक्ष अशा कार्यक्रमांवर बहिष्कार टाकत आहेत या बहिष्कारचे उत्तर शिवप्रेमी मावळे निश्चित देतील असा तिरकस टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगावला . छत्रपती शिवरायांना अभिप्रेत असणारे रयतेचे राज्य महायुतीच्या माध्यमातून चालवली जात आहे असे प्रतिपादन त्यांनी केले

शिवकालीन वाघनखांचे अनावरण आणि छत्रपती शिवाजी संग्रहालयाचे उद्घाटन या निमित्ताने आयोजित सातारा जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते . यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार,उत्पादन शुल्क मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार महेश शिंदे, आमदार मकरंद पाटील, आमदार जयकुमार गोरे, आमदार राजेंद्र राऊत,लंडनच्या गिल्बर्ट म्युझियमचे निकोलस मर्चंट जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधीक्षक समीर शेख इत्यादी मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले आजचा दिवस राजधानी सातारा आणि महाराष्ट्राच्या दृष्टीने भाग्याचा दिवस आहे .छत्रपतींचे मावळे म्हणून आम्ही राजधानी साताऱ्यात दाखल झालो आहोत .वाघनख्यांच्या अस्सलतेवर साशंकता घेतली जात आहे हे शिवरायांचे मावळे कदापिही सहन करणार नाही .भूतकाळाचा धागा वर्तमानात जोडला जात आहे . दहा नोव्हेंबर १६६१ मध्ये प्रतापगडच्या पायथ्याशी शिवपराक्रम घडला आणि अफजलखानाचा वध झाला . हा दैदिप्यमान इतिहास आहे .शिवरायांनी ३५ वर्षात पारतंत्र उखडून मुघलांना नेस्तनाबूत केले ,स्वराज्याचे वेगवेगळे दंडक त्यांनी तयार केले .त्या भूमीत आपला जन्म झाला हे आपलं भाग्य आहे . शिवरायांना अभिप्रेत असणारे रयतेच राज्य आम्ही साकारत आहोत . लाडकी बहीण योजना असो वा लाडका भाऊ या योजनांचे पैसे नियमाप्रमाणे पात्र लाभार्थींना मिळणारच आहेत अशी ग्वाही त्यांनी दिली . हा भगवा राष्ट्रप्रेमाचा आहे तो स्वाभिमानाची जाणीव करून देतो शिवरायांचा विजयाचा हुंकार या प्रदर्शनाच्या निमित्ताने खुला होत असून राज्याला तो दिशादर्शक ठरणार आहे . गडकोटाचे संवर्धन हे आम्ही प्रामाणिकपणे करत आहोत भारत-पाक सीमेवर मराठा बटालियन येथे छत्रपती शिवरायांचा पुतळा उभा केला आहे त्याच्या तलवारीचे टोक पाकिस्तानच्या दिशेने आहे त्यामुळे शत्रू वाकड्या नजरेने तिकडे पाहणार नाही . खासदार उदयनराजे भोसले हे छत्रपतींचे वारसदार आहेत प्रतापगड प्राधिकरण समिती स्थापन करण्यात आली असून उदयनराजे त्याचे अध्यक्ष आहेत त्याचा शासकीय अध्यादेशही आणला आहे यासाठी दीडशे कोटी रुपयांची तरतूद केली आहे अशी माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली .याशिवाय महाराणी ताराबाई यांच्या समाधी स्थळाचा जीर्णोद्धार आम्ही करणार असल्याचे त्यांनी सांगितले वाघ नखांच्या कार्यक्रमावर एकीकडे शिवप्रेमी आसुसलेले असताना दुसरीकडे विरोधी पक्ष त्यावर बहिष्कार घालतात छत्रपतींचे मावळे या विरोधाचे उत्तर देतील असा टोला त्यांनी लगावला..

# राज्याच्या नव्या पर्यटन धोरणातून १८ लाख रोजगार निर्मिती होणार!



## पर्यटन मंत्री गिरीश महाजनांना विश्वास

**मुंबई :** पर्यटनला चालना देण्यासाठी नवे पर्यटन धोरण तयार करण्यात आले आहे. या नव्या पर्यटन धोरणातून राज्यात अंदाजे १ लाख कोटींची गुंतवणूक, १८ लाख रोजगार निर्मिती करणार आहे. अशी माहिती राज्याचे पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक पर्यटन स्थळे आहेत. मुबलक दळणवळाची साधने आहेत त्यामुळे पर्यटनाद्वारे रोजगारनिर्मिती करता येऊ शकते यासाठी आणि पर्यटनला चालना देण्यासाठी नवे पर्यटन धोरण तयार करण्यात आले आहे. या नव्या पर्यटन धोरणाबद्दल पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी माहिती दिली ते म्हणाले, नव्या पर्यटन धोरणाद्वारे राज्यात अंदाजे १ लाख कोटींची गुंतवणूक, १८ लाख रोजगार निर्मिती करणार आहे. यामध्ये दहा वर्षात पर्यटनस्थळे तसेच पायाभूत सुविधा विकसित करुन पर्यटकांचा ओघ दुप्पट करण्याचे उद्दिष्ट आहे.

**मंत्री गिरीश महाजनांनी सांगितलेले धोरणातील काही प्रमुख मुद्दे**

देशातील व राज्यातील पर्यटकांना आकर्षित करणे, पर्यायाने व्यापार-उत्पन्न आणि उद्योजकता यांना चालना देणे, पर्यटन क्षेत्रामध्ये ग्रामीण व शहरी भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे. पर्यटन क्षेत्रात नवीन गुंतवणूक आणणे,राज्याच्या महसुलात वाढ करणे, राज्यातील वैविध्यपूर्ण, बहुप्रांतीय, बहुभाषिक संस्कृती लक्षात घेता स्थानिक लोकसंस्कृतीवर आधारित कार्यक्रम आणि उत्सवाचा पर्यटनाच्या विकासासाठी उपयोग करुन घेणे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करुन नवकल्पना, उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढविणे यावर या धोरणात भर देण्यात येणार आहे. एक खिडकी प्रणालीच्या संस्थात्मकीकरणासह खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी सक्षम वातावरण निर्माण करणे. केंद्र शासनाच्या मैत्री प्रणालीसह संलग्न केले जाणार आहे. पर्यटनासाठी प्रोत्साहन निधीही सरकारकडून दिला जाणार आहे. ५० हजार ते १५ लाख रुपयांपर्यंत हा प्रोत्साहन निधी असणार आहे. महिला उद्योजक, युवा पर्यटन, कौशल्य विकास कार्यक्रम, दुर्मिळ कला,संस्कृती आणि पाककला पुनरुज्जीवित करणे, नाविन्यपूर्ण उत्पादने/सेवा,दिव्यांगाना रोजगार इत्यादीसाठी हा निधी शासनाकडून दिला जाणार आहे. ग्रामीण व शहरी भागात पर्यटनाद्वारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करणे हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. राज्यात त्यासाठी उच्चतम दर्जाचे शाश्वत व जबाबदार पर्यटन विकसित करुन ग्रामीण भागातील पर्यटन व कृषी पर्यटनास वाव देण्याच्या दृष्टीने विविध पुरस्कारही देण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामीण भागातील पर्यटन उद्योगांसाठी होम स्टे, ग्रो टुरिझम या स्पर्धा विभागनिहाय राबविण्यात येणार आहेत.

# दुसऱ्या फिशर रँडम बुद्धीबळ ९६०; रॅपिड बुद्धीबळ स्पर्धेत ५८ खेळाडूंचा सहभाग

**पुणे :** बुद्धीबळ क्रीडा ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित व पुणे जिल्हा बुद्धीबळ सर्कल (पीडीसीसी) यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या दुसऱ्या फिशर रँडम (बुद्धिबळ९६०) रॅपिड बुद्धीबळ स्पर्धेत ५८ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. ही स्पर्धा प्रभात रोड येथील सिम्बायोसिस स्पोर्ट्स सेंटर या ठिकाणी २१ जुलै २०२४ रोजी रंगणार आहे.

सात किंवा आठ फेऱ्यांमध्ये खेळविण्यात येणार स्पर्धा

बुद्धीबळ क्रीडा ट्रस्टचे व्यवस्थापकीय विश्वस्त प्रकाश कुंटे यांनी सांगितले की, स्पर्धेत एकूण २१,000 रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत. तसेच, ही स्पर्धा स्विस लीग पद्धतीने सात



किंवा आठ फेऱ्यांमध्ये खेळविण्यात येणार आहे. ही स्पर्धा खुल्या गटात होणार आहे.

ग्रँडमास्टर अभिजित कुंटे हस्ते होणार उद्घाटन

स्पर्धेत मानांकित खेळाडूंमध्ये आयएम अभिषेक केळकर(२१४३), प्रथमेश शेरला(१९६२), विकास शर्मा(१९५२), विरेश शरणार्थी(१८९८), ओम लामकाने(१८७३), अक्षज पाटील(१८६१), आर्यन सिंगला(१८४५), सौरभ म्हामने(१८३०), श्लोक शरणार्थी(१८२६) हे खेळाडू आपले कौशल्य पणाला लावणार आहेत. आयए नितीन शेणवी चीफ आरबीटर , तर आयए विनिता क्षोत्री डेप्युटी चीफ आरबीटर म्हणून काम पाहणार आहेत. स्पर्धेचे उदघाटन ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे यांच्या हस्ते २१ जुलै २०२४ सकाळी ९ वाजता होणार असून पहिल्या फेरीस ९.१५ वाजता प्रारंभ होणार आहे.

# आरटीई प्रवेशांचा मार्ग मोकळा

**पुणे :** उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे ठप्प असलेली प्रवेश प्रक्रिया आता पुन्हा सुरू होणार आहे. प्रवेशासाठीची निवड यादी, प्रतीक्षा यादी कधी जाहीर होणार याकडे पालकांचे लक्ष लागले आहे. शिक्षण विभागाने निवडयादी, प्रतीक्षा यादीबाबतची माहिती दिली आहे.

आता खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला आहे. यंदा राज्यातील ९ हजार २०८ शाळांमध्ये १ लाख ८ हजार २१६ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी २ लाख ४३ हजार १०४ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत.

# सत्ता हातात आल्याशिवाय थांबायचे नाही

## शरद पवारांनी विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले

**अहमदनगर :** लोकसभा निवडणुकीमुळे देशाला एक नवी दिशा दाखवली आहे. येत्या सत्तर दिवसांत विधानसभेची निवडणूक होणार आहे. तयारीला लागा. तुम्ही सर्व एकत्र असाल तर तुम्हाला कुणीही धक्का लावू शकणार नाही, सत्ता तुमच्या हातात आल्याशिवाय राहणार नाही आता काही मागायचं नाही असे ठरवलं आहे. तुम्ही मला अनेकदा निवडून दिले, आता महाराष्ट्रात सर्वसामान्यांच्या हिताचे सरकार आणाये आहे. त्यासाठी तुमची शक्ती हवी आहे' असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी विधानसभेचे रणशिंग फुंकले.

अहमदनगरच्या अकोले याठिकाणी आज शरद पवार गटाचा शेतकरी मेळावा पार पडला. यावेळी खासदार निलेश लंके, भाऊसाहेब वाकचौरे हेदेखील उपस्थित होते. यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले, राज्यातील सत्ताधाऱ्यांनी शेती आणि शेतकऱ्यांविषयी



आस्था राहिली नाही. पण आता जबाबदारी आपली आहे. लोकसभा निवडणुकीत तुम्ही उत्तम काम केले. पाचवर्षांपूर्वी लोकसभेत काँग्रेसला एक आणि राष्ट्रवादी काँग्रेसला चार जागा मिळाल्या. पण या निवडणुकीत ४८ पैकी १८ जागा महाविकास आघाडीला मिळाल्या, याचा मला अभिमान आहे.

सत्तेचा वापर बळीराजाच्या फायद्यासाठी करणे हे राज्यकर्त्यांचे सूत्र असायला पाहिजे. पण देश आज वेगळ्याच संकटाचा सामना करत आहे. शेतीला जोडधंदा म्हणून दूधाच्या धांद्याकडे बघितले जायचे, पण आज त्या दुधासाठी संघर्ष करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. असेही शरद पवार यांनी नमुद केले.

पुणे, नाशिक, सातारा,सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी कोणताही विचार न करता कांद्याचे पीक घेतो. त्याबदल्यात त्याला फक्त कांद्याला रास्त दर मिळावा, एवढीच मागणी असते. पण कांद्याला तसा रास्त भाव मिळत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नाशिकमध्ये सभा झाली. यासभेत एका शेतकरी उठला आणि तुम्ही जगाच्या गोष्टी सांगताय, त्यापेक्षा माझ्या कांद्याला भाव द्या' असे म्हणाला. तर त्याला पोलिसांनी त्याला पकडलं आणि तुरुंगात टाकले. आता कांद्याला भाव मागण्याचा अधिकारही या देशात नाही. हे मोदींच्या राज्यात नाशिकमध्ये समोर आले, असा अशी टीकाही शरद पवार यांनी यावेळी केली.

# विशाळगडावरील अतिक्रमणविरोधी कारवाईला स्थगिती, हायकोर्टाने राज्य सरकारला सुनावले

**मुंबई:** विशाळगडावर झालेला हिंसाचार आणि अतिक्रमणाच्या कारवाईमुळे कोल्हापूर जिल्ह्यासह राज्यभरात तणाव निर्माण झाला आहे. याप्रकरणी उच्च न्यायालयात दाद मागण्यात आली होती. या प्रकरणाची शुक्रवारी तातडीने सुनावणी झाली असून यावेळी उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि स्थानिक यंत्रणेवर ताशेरे ओढले आहेत. न्यायमूर्ती बी.पी. कुलाबावाला आणि न्यायमूर्ती फिरदोश पुन्नीवाला यांच्या खंडपीठापुढे या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायमूर्तींनी प्रशासनाला खडेबोल सुनावले. यावेळी न्यायालयाने विशाळगडावरील कारवाई तातडीने थांबवण्याचे निर्देशही दिले.

पावसाळ्या कारवाई तात्काळ थांबवा, सप्टेंबरपर्यंत कुठलीही नवी तोड कारवाई नको, असे आदेश उच्च न्यायालयाने दिले. भर पावसात तिथल्या बांधकामावर हातोडा चालवण्याची काय गरज होती?,असा सवालही न्यायालयाने विचारला. विशाळगडावर आंदोलकांनी मशिदीवर चढाई केल्याचा याचिकाकर्त्यांचा आरोप गंभीर आहे, असे निरीक्षण न्यायालयाने म्हटले.

विशाळगडावरील बांधकामांना याचिकेवरील अंतिम सुनावणीपर्यंत संरक्षण



देण्याची याचिकेतून मागणी करण्यात आली होती. या बांधकामांविरोधातील कारवाईदरम्यान घडलेल्या घटनांविषयी याचिकेत उल्लेख याचिकाकर्त्यांनी केला होता. विशाळगडावरील अतिक्रमणं हटवण्याची मोहीम सध्या स्थानिक प्रशासनानं हाती घेतली होती. काही उजव्या विचारसरणीच्या संघटनांकडून 'चलो विशाळगड' किंवा 'विशाळगड बचाव' मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेला आणि आंदोलनाला हिंसक वळण लागल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला होता. भर पावसात तिथल्या बांधकामावर हातोडा चालवण्याची काय गरज होती? असा प्रश्न मुंबई हायकोर्टानं राज्य सरकारला विचारला.

उच्च न्यायालयाने शाहूवाडी पोलीस ठाण्याच्या मुख्य अधिकाऱ्याला न्यायालयातहजर राहण्याचे निर्देश जारी केले आहेत. याचिकाकर्त्यांनी विशाळगडावर झालेल्या तोडफोडीचे त्या दिवशीचे तोडफोडीचे व्हिडिओ कोर्टात दाखवले. 'जय श्री राम' चा नारा देत शिवभक्त तोडफोड करत असल्याचं व्हिडीओतून स्पष्ट होत असल्याचा दावा याचिकाकर्त्यांकडून करण्यात आला. तसेच तिथं उपस्थित अधिकाऱ्यांनीच जमावाला मोकळीक दिल्याचा आरोप करण्यात आला. हा युक्तीवाद ऐकल्यानंतर विशाळगडावर तोडफोड होत असताना सरकार काय करत होत? असा सवाल न्यायालयाने केला. तसेच कायदा सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी कुणाची आहे, असे विचारत कोर्टाने सरकारवर ताशेरे ओढले.

शाहू महाराज यांचे पुत्र संभाजीराजे यांनी गेल्या काही दिवसांपासून विशाळगडावरील अतिक्रमणाविरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. यानंतर १४ जुलै रोजी संभाजीराजे छत्रपती विशाळगडाच्या परिसरात गेले होते तेव्हा काहीजणांचा जमाव हिंसक झाला होता आणि त्यांनी विशाळगडाच्या परिसरात तोडफोड केली होती. यानंतर जिल्हा प्रशासनाने विशाळगडावरील अतिक्रमणही हटवले होते.

मात्र, त्यापूर्वी विशाळगडावरील मशिदीत हिंसक जमावाकडून तोडफोड करण्यात आली होती. याशिवाय, विशाळगडाच्या परिसरातील गजापूर आणि मुस्लीमवाडी परिसरातील घरादारांचेही जमावाकडून नुकसान करण्यात आले होते. यानंतर कोल्हापूरचे खासदार शाहू महाराज छत्रपती यांनी विशाळगडाला भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली होती. शाहू महाराजांनी गजापूरमध्ये तोडफोड झालेल्या नागरिकांच्या व्यथा ऐकून घेतल्या होत्या. ही घटना म्हणजे जिल्हा प्रशासन आणि पोलिसांचे अपयश असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. विशाळगड परिसरात नुकसान झालेल्यांना सरकारने तातडीने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणीही शाहू महाराज छत्रपती यांनी केली होती.

विशाळगडावरील अतिक्रमण हटवण्याच्या कारवाईला हायकोर्टाने स्थगिती दिल्यानंतर अजितदादा गटाचे नेते हसन मुश्रीफ आणि शरद पवार गटाच्या जितेंद्र आव्हाड यांनी एबीपी माझाशी संवाद साधला. यावेळी उभय नेत्यांमध्ये शाब्दिक युद्ध रंगले होते. आव्हाडांच्या प्रश्नावंर मुश्रीफ बचावत्मक पवित्र्यामध्ये असून आले. कारवाईमध्ये कोणाचा हात होता अशी विचारणा केली असता मुश्रीफ यांनी कारवाईसाठी प्रेशर होतं, असे सांगितले.

# आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा सर्वाधिक जागांवर दावा

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीकडे काँग्रेस सर्वाधिक जागांवर दावा करणार आहे. केंद्रीय पातळीवरील नेत्यांसह राज्यभरातील जिल्हाध्यक्षांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. विधान परिषद निवडणुकीत पक्षादेशा विरोधात मतदान करणाऱ्या फुटीर आमदारांबाबतही या बैठकीत चर्चा झाली. त्यांच्यावरील कारवाईचा निर्णय दिल्लीत गेल्यावर घेऊ, असे केंद्रीय नेत्यांनी स्पष्ट केले आहे.

काँग्रेसचे महासचिव के सी वेणूगोपाल, महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत काँग्रेसच्या राज्यातील सर्व जिल्हाध्यक्षांची बैठक टिळक भवन येथे पार पडली. या बैठकीत प्रामुख्याने आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

**काँग्रेसच्या आत्मविश्वासाने मित्रपक्ष अस्वस्थ?**

लोकसभा निवडणुकीत



महाविकास आघाडीने राज्यात भाजपच विजय रथ रोखण्यात यश मिळवले. त्यामध्ये काँग्रेसचा मोठा वाटा आहे. या यशामुळे काँग्रेस नेते कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास द्विगुणीत झाला आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीकडून आपल्याला सर्वाधिक जागा मिळाव्या, अशी मागणी काँग्रेस कडून केली जाणार आहे. एकीकडे महायुतीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव ठाकरे गट या तीनही प्रमुख पक्षांनी समसमान ९६ जागा लढवाव्या, अशी चर्चा सुरू असताना काँग्रेसच्या सर्वाधिक जागांच्या दाव्यामुळे इतर घटक पक्षांमध्ये अस्वस्थता निर्माण होऊ शकते.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्यातील महायुती सरकारने अनेक लोकप्रिय योजना जाहीर केल्या आहेत. या योजनांचा धसका काँग्रेसने घेतला असल्याचे चित्र या बैठकीत बघायला मिळाले. मध्यप्रदेशमध्ये भाजपा सरकारने लाडली बहना योजना अमलात आणल्यानंतर त्या राज्यात लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे पानिपत झाले.

# केंद्र शासनाच्या दुबळ्या धोरणामुळे जवान शहीद होणे क्लेशदायक : सचिन मोहिते

## शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांचे पोवई नाक्यावर आंदोलन

**सातारा :** देशाच्या सीमेवर लष्करातील जवानांचे अतिरेक्यांच्या घातक हल्ल्यांमध्ये शहीद होणे हे केंद्र शासनाच्या दुबळ्या धोरणाचा परिणाम आहे .केंद्रीय गृहमंत्रालय याबाबत काय धोरण आखते आहे? दुबळ्या धोरणांचा फटका लष्करातील जवानांना बसत आहे अशी टीका करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने पोवई नाक्यावर गुरुवारी निषेध आंदोलन करण्यात आले यावेळी कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारचं करायचं काय खाली मुंडी वर पाय अशा निषेधाच्या घोषणा दिल्या




या आंदोलनामध्ये जिल्हाप्रमुख सचिन मोहिते ,सादिक बागवान, रुपेश वंजारी, प्रणव सावंत, सागर रायते, सुनील पवार, सचिन जगताप, शिवराज टोणपे, रवींद्र बंगे, हरी पवार, तानाजी चव्हाण, इमरान बागवान, आरिफ शेख ,अजित काळेल, आकाश धोंडे ,अक्षय वाघमारे, आजाद शेख, अक्षय सावंत, राहुल ननावरे, प्रशांत इंगळे, किशोर साळुंखे,सुनील मोहिते ,निलेश चव्हाण, संदीप मोहिते इत्यादी यावेळी उपस्थित होते यावेळी शिवसेनेच्या वतीने पोवई नाक्यावर छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन करून केंद्र शासन व गृह मंत्रालय यांच्या दुबळ्या धोरणांचा निषेध करण्यात आला.

जिल्हाप्रमुख सचिन मोहिते म्हणाले भारताचे शेजारी राष्ट्र पाकिस्तान हे सातत्याने अतिरेकी हमल्याद्वारे दहशतवादाला चिथावणी देत आहे .पुलवामा प्रकरण जेव्हा घडली तेव्हा ४०० किलो आरडीएक्स भारतात आणले गेले याची गृह मंत्रालयाला कल्पना नव्हती काय? केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रशासनाची दुबळी धोरणे जवानांच्या मृत्यूला कारणीभूत आहे त्यामुळे त्यांचा निषेध करण्यात येत आहे असे म्हणून निषेधाचा काळा फलक शिवसेना कार्यकर्त्यांनी नाक्यावर झळकवला .यावेळी एका कार्यक्रमासाठी राज्याचे पालकमंत्री व शिवसेना शिंदे गटाचे आमदार शंभूराजे देसाई पोवई नाक्यावरून जात होते. शिवसेना कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करून पालकमंत्री देसाई यांचे लक्ष वेधून घेतले या राजकीय योगायोगाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा होती.

# घरवापसीच्या चर्चांना पिचड यांच्याकडून पूर्णविराम

**अहमदनगर :** राष्ट्रवादी काँग्रेस मधून भारतीय जनता पक्षात आलेले ज्येष्ठ नेते मधुकरराव पिचड आणि त्यांचे चिरंजीव वैभव पिचड शरद पवार गटात घरवापसी करणार असल्याच्या केवळ अफवा पसरविल्या जात असल्याचे खुद्द वैभव पिचड यांनीच स्पष्ट केले.

मधुकरराव पिचड यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणून राज्याचा कानाकोपरा पिंजून काढला आणि पक्ष मोठा केला. भाजपमध्ये आल्यावर तेच काम आम्ही भाजपसाठी प्रामाणिकपणे करीत आहोत. तालुक्यात सर्वत्र पक्षाचे कमळ पोहोचविण्याचे काम आम्ही केले आहे. इतकी वर्ष काम केल्यानंतर आम्ही भाजपमध्ये खऱ्या अर्थाने रुळले आहोत. त्यामुळे शरद पवार गटात घर वापसी करण्याचा प्रश्नच येत नाही, असे वैभव पिचड यांनी स्पष्टपणे सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट महायुतीचा घटक असून अकोले विधानसभा मतदारसंघात डॉ किरण लहामटे हे त्या पक्षाचे आमदार आहेत. अर्थातच आगामी विधानसभा निवडणुकीत वैभव पिचड यांना डावलून महायुतीकडून डॉ लहामटे यांना पुन्हा उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे पिचड पिता-पुत्र शरद पवार गटात घरवापसी करणार असल्याचे सांगितले जात होते. मात्र, वैभव पिचड यांनी तूर्तास या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांचा सध्या राज्याचा दौरा सुरू असून नगर जिल्ह्यात त्यांच्या कार्यक्रमांना गर्दी जमवण्यासाठी मधुकर पिचड आणि वैभव पिचड पक्ष बदलणार असल्याच्या चर्चा घडविल्या जात आहेत का, असा सवाल वैभव पिचड यांनी केला. त्याचप्रमाणे आपले पक्षातर्गत आणि इतरपक्षीय विरोधक कार्यकर्त्यांमध्ये आणि भाजपमध्ये अस्वस्थता निर्माण करण्यासाठी हा अपप्रचार करीत आहेत, असा आरोपही त्यांनी केला. विधानसभेची उमेदवारी मिळण्याबाबत आशावादी महायुतीकडून आमदार सांभाळण्यासाठी नव्हे तर कामाचे मूल्यमापन करून जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी उमेदवारी दिली जाते, असे सांगत वैभव पिचड आगामी विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळण्याबाबत आपण आशावादी असल्याचे सूचित केले. त्याचप्रमाणे त्यांनी आमदार डॉ लहामटे यांच्यावर त्यांनी टीकाही केली. अकोले तालुका हा राजकीय दृष्ट्या आणि विशेषतः पाण्याच्या प्रश्नासाठी सजग आणि संवेदनशील आहे. विद्यमान आमदार आपल्या कार्यकाळात पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी काहीही करू शकले नाहीत, असा दावाही त्यांनी केला.

# विशाळगड हिंसाचाराची न्यायालयीन चौकशी करा

## परिवर्तनवादी संघटना समन्वय समितीची मागणी

**सातारा :** विशाळगड व पायथ्याच्या गजापूर येथे झालेल्या शिवसाचाराबाबत सविस्तर न्यायालयीन चौकशी व्हावी, या पाठीमागे असलेल्या मुस्लीम विरोधी षडयंत्राचा शोध घेण्यात यावा, यामध्ये नुकसान झालेल्या रहिवाशांना तातडीने संरक्षण मिळावे व सविस्तर पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी या सर्व हिंसाचाराला उद्युक्त करणारे कोल्हापूरचे छत्रपती संभाजीराजे, संभाजी भिडे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर कठोर फौजदारी कारवाई करण्यात यावी या व इतर मागण्यांचे निवेदन आज मुख्यमंत्र्यांना देण्यासाठी सातारच्या जिल्हाधिकाऱ्यांना परिवर्तनवादी संघटना समन्वय समितीच्या वतीने देण्यात आले.

साताररचे निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांना शिष्टमंडळाने भेटून त्यांना हे निवेदन दिले.

शिष्टमंडळामध्ये एडवोकेट वसंतराव नलावडे, एडवोकेट दिलावर मोदी, विजय मांडके, मिनाज सय्यद, प्रमोद परामणे, विजय निकम, सलीम आतार, जमीर शेख, मोहसीन शेख,गफुर सय्यद, अस्लम तडसरकर, मुन्वर कलाल आदींचा समावेश होता.

निवेदनात म्हटले आहे की कोल्हापूरच्या पोलीस अधीक्षकांनी स्वतः दिलेल्या माहितीनुसार एका विशिष्ट समाजाच्या घरांवर दगडफेक व तोडफोड करण्यात आली. मुस्लिमांना लक्ष करण्यात आले आहे. अतिक्रमण हटवणे ही जबाबदारी प्रशासनाची असताना व त्यासाठी कायदेशीर मार्ग उपलब्ध असताना अशा पद्धतीने हिंसकरीत्या धर्माची साद घालत अतिक्रमण हटवण्याचा नारा देणे आणि त्यासाठी आंदोलन आयोजित करून हिंसाचार भडकवणे यामागे निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ध्रुवीकरण करण्यासाठी केलेले हे धार्मिक राजकारण आहे.

विशाळगड व गजापूर येथील झालेल्या हिंसाचारात ज्यांचे नुकसान झाले आहे अशा व्यावसायिकांचे योग्य पुनर्वसन करण्यात यावे व त्यांच्या रोजगाराची सोय करण्यात यावी तसेच सातारा जिल्ह्यामध्ये देखील अशा हिंदू - मुस्लिम संयुक्त धार्मिक परंपरा असणाऱ्या दर्ग्यांच्या बाबतीत वेगवेगळे वाद निर्माण केले जात आहेत. त्याविषयी वेळीच खबरदारी घेतली पाहिजे. विशाळगड सारख्या प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सर्वांना विश्वासात घेऊन हे प्रश्न वेळीच सोडवले पाहिजेत यासाठी जिल्हा प्रशासनाच्या पातळीवर पुढाकार घेतला जावा अशी ही मागणी करण्यात आली आहे.

# बारामतीत बघायला मिळणार काका पुतण्यांची लढत

**बारामती :** आगामी विधानसभा निवडणुकीत बारामतीत काका आणि पुतण्या यांची लढत बघायला मिळणार आहे. या मतदारसंघातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून युगेंद्र पवार यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. स्वतः युगेंद्र पवार यांनीच तसे सूचित केले आहे.

विधानसभा निवडणूक लढविण्याबद्दल आपण अद्याप कोणताही विचार केलेला नाही. मात्र, मी निवडणूक लढवावी अशी लोकांची इच्छा असेल तर त्याचा विचार करावाच लागेल, असे युगेंद्र पवार यांनी सांगितले. विधानसभा निवडणुकीला अद्याप ९० दिवसांचा कालावधी आहे. त्यामुळे निवडणूक लढविण्यासंबंधी विचार करण्यास अजून अवधी आहे, असेही ते म्हणाले. योगेंद्र पवार हे अजित पवार यांचे बंधू श्रीनिवास यांचे पुत्र आहेत. लोकसभा निवडणुकीत बारामतीत सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्यात लढत झाली. या निवडणुकीत सुप्रिया सुळे यांचा प्रचार करताना युगेंद्र पवार यांनी अनेकदा अजित पवार यांच्यावर थेट टीका केली आहे. शरयू ॲग्रो या कंपनीचे ते मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. विद्या प्रतिष्ठानचे ते खजिनदार आहेत. योगेंद्र पवार हे बारामती कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्षही होते. मात्र, या संस्थेवर अजित पवार यांचा वर चष्मा असून नुकतेच त्यांना अध्यक्षपदावरून हटविण्यात आले आहे.

# आषाढी एकादशी निमित्त रिपाई आंबेडकर गटाच्या वतीने वारकऱ्यांना फराळ वाटप

**वडूज :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर गटाच्या) तालुकाध्यक्ष सागर भिलारे यांच्याकडून आषाढी एकादशी निमित्त भक्तांना वडूज बस स्थानकात फराळ वाटप करण्यात आले. यावेळी वडूजसह परिसरातील अनेक भाविक भक्तांनी याचा लाभ घेतला. यावेळी टायगर ग्रुपचे प. महाराष्ट्र अध्यक्ष शैलेशबाबा जाधव, तालुका सल्लागार विजय यादव सूरज जाधव अशोक जाधव दीपक जाधव शेखर गुजले पिंटू बैले संदीप मदने या सर्वांच्या हस्ते फराळ वाटप करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की आषाढी एकादशी निमित्त वडूज येथे एसटी स्टँड परिसरात फराळ वाटप समारंभ ठेवण्यात आला होता. येथील कर्मवीर नगर येथील विठ्ठल रुक्माई मंदिरात नैवेद्य देऊन व दर्शन घेऊन दुपारी ठीक ११ वाजता या समारंभास प्रारंभ करण्यात आला. यावेळी भाविकांना खिचडी व केळी देण्यात आली. एसटी स्टँड परिसरात सर्व वारकऱ्यांनी व ग्रामस्थांनी या फराळाचा लाभ घेतला.

या उपक्रमासाठी राजू शेटे,विकास ठिगळे , निलेश जाधव, राजू फडतरे यांनी फराळाचे पदार्थ तर सातेवाडी येथील वैभव नामदास यांनी त्यांचे वाहन फराळ वाटण्यासाठी दिलं.

## गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**सातारा :** गळफास घेऊन एकाने आत्महत्या केल्याची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १७ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास यशवंत बबन चव्हाण रा. कामथी, पोस्ट वेळे, ता. सातारा यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. अधिक तपास पोलीस हवालदार वायदंडे करीत आहेत.

## अवैध दारू विक्री प्रकरणी एकावर कारवाई

**सातारा :** अवैध दारू विक्री प्रकरणी सातारा तालुका पोलिसांनी एकावर कारवाई केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १७ रोजी दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास सातारा शहरातील क्षेत्र माहुली गावच्या हद्दीत रेल्वे स्टेशन जवळ तेथीलच अतुल शशिकांत केंजळे हे अवैधरित्या दारू विक्री करताना आढळून आले. त्यांच्याकडून २ हजार ४१० रुपयांच्या देशी-विदेशी दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

## दोन वेगवेगळ्या घटनेत दोन जण बेपत्ता

**सातारा :** दोन वेगवेगळ्या घटनेत दोन जण बेपत्ता झाल्याच्या फिर्यादी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये नोंदविण्यात आल्या आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १७ रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास सातारा तालुक्यातील २१ वर्षीय युवती राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता निघून गेली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार गोरे करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत दि. १७ रोजी प्रतीक सुरेश जमदाडे मु. इंगळेवाडी, पोस्ट नुने, ता. सातारा सध्या रा. शाहूनगर, सातारा हा घरातून कोणास काही एक न सांगता निघून गेला आहे. अधिक तपास सहाय्यक फौजदार दिघे करीत आहेत.

## अजिंक्यतारा किल्ल्यावर एकाची आत्महत्या

**सातारा :** अजिंक्यतारा किल्ला येथे एकाने झाडाला दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना बुधवारी रात्री घडून गुरुवार, दि. १८ रोजी सकाळी बारा वाजता उघडकीस आली. प्रतिक सुरेश जमदाडे वय २७ रा. इंगळेवाडी पो. नुने ता.सातारा सध्या रा. शाहूनगर सातारा असे त्या युवकाचे नाव आहे. आत्महत्या करण्यापूर्वी नातेवाईकांना त्याने व्हिडीओ कॉल केला होता. पण आत्महत्येचे कारण अद्यापही समजू शकले नाही. याबाबतची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, प्रतिक जमदाडे हा विवाहित असून पत्नी व एक लहान मुलगा आहे. मात्र, तो शाहूनगर येथून बेपत्ता होता. त्याचा शोध अनेक ठिकाणी नातेवाईकांनी घेवूनही लागला नसल्याने अखेर प्रतिक जमदाडे यांच्या नातेवाईकांनी बुधवार, दि. १७ रोजी रात्री दहा वाजता सातारा शहर पोलीस ठाण्यात तो मिसींग झाल्याबाबतची तक्रार नोंदवली.

दरम्यान, गुरुवारी सकाळी अजिंक्यतारा किल्ला येथे एका झाडाला दोरीने गळफास घेतल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. यानंतर नागरिकांनी याबाबतची माहिती शहर पोलीस ठाण्यास कळविल्यानंतर घटनास्थळी पोलिसांनी जात त्याचा मृतदेह ताब्यात घेवून शवविच्छेदनास पाठवून नंतर नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे. आत्महत्या करण्याचे कारण मात्र अद्यापही अस्पष्टच आहे. याबाबतचा अधिक तपास हवालदार पाटोळे करत आहेत.

## अनपटवाडी येथून म्हैस चोरीला...

**कोरेगाव :** अनपटवाडी ता. कोरेगाव येथून ऐंशी हजार रुपये किमतीची म्हैस चोरीला गेल्याची तक्रार वाठार पोलीस स्टेशन मध्ये देण्यात आलेले आहे.

# राष्ट्रवादी बँजो कलाकार विभागाचा साताऱ्यात मोर्चा



**सातारा :** वृध्द बँड, बँजो कलाकारांना मानधन मिळावे या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या बँड बँजो चालक व कलावंत विभागाच्यावतीने सातारा जिल्हा परिषद कार्यालयावर वाजत गाजत मोर्चा काढण्यात आला.

संघटनेने सातारा जिल्ह्यातील पुसेगाव व सातारा येथे वृध्द बँड, बँजो कलाकारांना मानधन मिळण्यासाठी पुसेगाव व सातारा येथे शिबीर घेवून शासन निर्णयाप्रमाणे वृध्द कलाकारांचे फॉर्म भरून घेण्यात आले. पोवईनाका येथे प्रदेशाध्यक्ष प्रा. अशोकराव जाधव, उपाध्यक्ष बाळासाहेब जाधव, सरचिटणीस सुभाषराव अडागळे, कार्याध्यक्ष सचिनराव वायदंडे यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर पोवईनाका ते जिल्हा परिषद कार्यालय वाजत गाजत मोर्चा काढण्यात आला.यावेळी जिल्हा समाजकल्याण अधिकारी नितीन उबाळे यांना वृध्द कलाकार मानधनाचे फॉर्म सादर करण्यात आले. यावेळी गणेश साळुंखे, संतोष वायदंडे, संजय भिंगारदिवे,दौलतराव लोखंडे, संजय जाधव, ज्येष्ठ कलाकार दाऊद मास्तर, विठ्ठल माने, किरण जाधव पदाधिकारी व वृध्द कलाकार उपस्थित होते.

# लष्करी अळीमुळे पिकांना फटका

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात मक्याचे पीक घेतले जाते. सध्या बहुतांश ठिकाणी मक्याच्या पिकावर लष्करी अळी पडायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. म्हणून मक्याच्या पिकाची काळजीही घ्यायला हवी. या मक्याच्या पिकावर पडलेल्या लष्करी अळीचे कशा पद्धतीने नियोजन करावे, हेच आपण जाणून घेणार आहोत.

कृषी अधिकारी टी. एस. मोटे यांनी याबाबत माहिती दिली. लोकल१८ शी बोलताना त्यांनी सांगितले की, मका पिकावर काही भागांमध्ये लष्करी अळी पडायला सुरुवात झालेली आहे. याचं लक्षण म्हणजे, ही आळी पिकांचे पाने कुरतडून खायला सुरुवात करते. शेतकऱ्यांनी व्यवस्थित नियोजन जर केलं, तर ही अळी नियंत्रणात येऊ शकते.

जर वातावरणामध्ये आद्रता चांगली असेल तर लिंबोळी अर्काची फवारणी ही मका पिकावर करायला हवी. हा सर्वात स्वस्त उपाय आहे. यामुळे ही अळी नष्ट व्हायला मदत होईल. त्यासोबतच तुम्ही बायोझरेड याचा वापर करू शकता.

मेटाऱ्हायझीम ॲनीसोप्ली हे फवारणीचे औषध प्रति ५० ग्राम दहा लिटर पाण्यात टाकून याची फवारणी करावी.

# हसंजय राऊत यांचा खोचक सवाल

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः ला सुपरमॅन समजतात. रशिया आणि युक्रेन यांच्यामधील युद्ध आपणच थांबवले असा त्यांचा समज आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यामधील युद्ध थांबवण्याची क्षमता असलेले मोदी देशांतर्गत मणिपूर आणि जम्मू कश्मीर मध्ये सुरू असलेला दहशतवाद आणि हिंसाचार का थांबवू शकत नाहीत, असाच सवाल शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला.

**स्वतःला समजतात विष्णूचा अवतार**

मोदी स्वतःला विष्णूचा अवतार समजतात. प्रभू श्रीरामांचे बोट धरून मीच त्यांना अयोध्येच्या श्रीराम मंदिरात नेते, अशी त्यांची समजूत आहे. ते नसते तर राम मंदिराची उभारणी झालीच नसती, असा आव ते आणतात. आपण नैसर्गिक पद्धतीने जन्माला आलेलो नसत नाही तर परमेश्वराने आपल्याला निर्माण केले आहे, असा समज ते पसरवतात, अशी टीका राऊत यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर केली.

मुंबई आणि कोकणात शिवसेनेचा प्रभाव

महाविकास आघाडीच्या जागावाटपात शिवसेना उद्धव ठाकरे गटाने मुंबईत तब्बल २५ जागांची मागणी केली आहे का, याबाबत विचारणा केली असता राऊत यांनी ही वस्तुस्थिती नसल्याचे सांगितले. विधानसभेच्या जागा वाटपाबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. सर्व घटक पक्ष एकत्रित चर्चा करून त्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणाले. विदर्भात काँग्रेसची ताकद आहे. पश्चिम महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस सशक्त आहे. त्याचप्रमाणे मुंबई आणि कोकणात शिवसेनेचा प्रभाव आहे. मुंबईत लोकसभेच्या आणि विधानसभेच्या जागा आम्ही जिंकत आलो आहोत. या सर्व बाबी लक्षात घेऊनच महाविकास आघाडीत जागावाटप केले जाईल, असे राऊत यांनी स्पष्ट केले.

# कुसगाव ग्रामस्थांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर अर्धनग्न आंदोलन



सातारा : कुसगाव तालुका वाई येथील ग्रामस्थांनी पोलिसांच्या दबाव तंत्राच्या कार्यपद्धतीमुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर अर्धनग्न आंदोलन केले .पोलिसांच्या विरोधात यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनांमध्ये सुमारे ५० ग्रामस्थ सहभागी झाले होते यासंदर्भात जिल्हा प्रशासनाचे निवासी जिल्हाधिकारी नागेश पाटील यांना निवेदन सादर करण्यात आले

या निवेदनात नमूद आहे की कुसगावच्या हद्दीत ब्लॅक स्टोन क्रशर चे मालक आणि पोलीस यांच्यात संगनमत आहे .व्यावसायिकांच्या सांगण्यावरून पोलीस ग्रामस्थांना वेठीस धरत असून ग्रामस्थांच्या विरोधात ३५३ सारख्या गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहे .याची माहिती वाई पोलीस निरीक्षक जितेंद्र शहाणे वाई उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या समावेत बैठकांमध्ये देण्यात आली. गुन्हा दाखल केल्यासंदर्भात अनेक चर्चा झाल्या, गुन्हा दाखल केला नसल्याचे पोलीस सांगत आहेत जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाची सुनावणी लावल्यानंतर क्रेशर संदर्भात मालकाच्या विरोधात निकाल जाईल या भीतीपोटी ग्रामस्थांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे असे सांगण्यात आले आणि आता अटक होणार अशी परिस्थिती निर्माण करण्यात आली.

पोलिसांची ही सर्व कारवाई पूर्वग्रहदूषित आहे. संबंधित क्रेशर मालक यांच्याशी बैठक करा तोडगा निघणे सोपे जाईल असा दबाव तयार करण्यात येत असून पोलिसांकडून दमदाटी होत आहेत.

# सृष्टी युवा फाउंडेशनच्या वतीने व्यसनमुक्ती अभियान



**हडपसर :** सध्या तरुणवर्गामध्ये व्यसनाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढल्याने युवा पिढी व्यसनाधीन होत असल्याचे दिसून येत आहे.

सृष्टी युवा फाउंडेशनच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व शिक्षा अभियान अंतर्गत व सृष्टी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोरवाडी वस्ती शाळा मोरवाडी येथे व्यसनमुक्ती अभियान राबविण्यात आले यात ८० मुलेमुलीं व तीन शिक्षक सहभागी झाले होते

झोपडपट्टीमध्ये वस्तीमध्ये तरुणांमध्ये महिला युवक पुरुष यांचा बरोबर विशेषतः लहान शालेय बालकांमध्ये व्यसनांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन व्यसनमुक्ती अभियान राबविण्यात आले.

व्यसनमुक्ती अभियानामध्ये प्रभात फेरी,पथनाट्य,व्याख्याने व शालेय विद्यार्थ्यांनी चित्रकला काढून प्रबोधन केले, यात परशुराम आबाजी जगताप आश्रम शाळेच्या प्राचार्य रामराजे मोराळे, उपप्राचार्य सुधीर पाटील, तसेच वसुधरा ॲग्रो चे चेअरमन काकासाहेब मोरे वस्ती शाळेचे प्रमुख राहुल विभुते यांनी मार्गदर्शन केले, तसेच सृष्टी युवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा.राजेश भोईटे यांनी प्रोत्साहन दिले.

व्यसन मुक्ती अभियान ठिकठिकाणी राबविण्यात येणार असून व्यसन मुक्ती करणे , विद्यार्थ्यांमध्ये तसेच तरुण वर्गामध्ये जनजागृती करणे हा आमचा उपक्रम आहे असे भोईटे यांनी सांगितले.

# अतुल मर्ढेकर यांची संजय गांधी निराधार व स्वावलंबन योजनेचे नायब तहसीलदारपदी पदोन्नतीने

**वाई :** येथील तहसील कार्यालयातील पुरवठा निरीक्षक अतुल गजानन मर्ढेकर यांची संजय गांधी निराधार व स्वावलंबन योजनेचे नायब तहसीलदार म्हणून वाई तहसील कार्यालयात पदोन्नतीने नियुक्ती झाली.

पसरणी (ता. वाई) येथील रहिवासी असलेल्या मर्ढेकर यांनी यापूर्वी प्रांत कार्यालय, पुरवठा अव्वल कारकुन, महसूल अव्वल कारकुन म्हणून वाई,महाबळेश्वर व खंडाळा येथे काम केले आहे.

उपविभागीय अधिकारी राजेंद्रकुमार जाधव,तहसीलदार सोनाली मेटकरी, गायब तहसीलदार वैशाली घोरपडे,भाऊसाहेब जगदाळे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# !! खरंच गंगेत घोडं न्हाणार का ? !!

विषय अर्थातच किसनवीर सहकारी साखर कारखाना भुईंज व खंडाळा. नुकतीच दोन्ही कारखान्यांना अनुक्रमे ३५० व १५० अशी ५०० कोटी व दुष्काळ निधी ४४ कोटी मंजूर जाहीर झाल्याची माहिती कारखाना व्यवस्थापनाने प्रसिद्ध केली. ही मदत कोणामुळे मिळाली, कोणी खेचून आणली इ. इ.चर्चांना जिल्ह्यात ऊत आलाय, कशामुळे मदत मिळाली, अचानक सरकारला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांविषयी, महिलांविषयी कळवळा कसा काय आला. जे सत्ताधारी आहेत त्यांना श्रेय घेण्याचा अधिकार आहे.

सरकार विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर खाडकन जागं झालं याचं गुपित महाराष्ट्रात होऊन गेलेल्या लोकसभा निवडणुकीत आहे, महाराष्ट्रातील मतदारांनी भाजपप्रणित महायुतीच्या पेकाटात जो काय दणका दिला आहे त्याचीच परिणीती वरील मदतीत दिसते हे खरं आहे, लोकसभा निकालानंतर एक फुल दोन हाफ सरकारच्या चेहऱ्याचा रंग उडाला, अलीकडेच जयंत पाटलांनी (गरूरपीं झरींळश्र ) म्हटले आहे चादर लगी फटणे तो खैरात लगी बटणे. ते काही जरी असलं तरी दोन्ही कारखान्यांना मिळणारी मदत ही स्वागतार्ह आहे त्यामुळे किसनवीर कारखान्याचा कोंडलेला श्वास मोकळा होण्यास मदत होणार आहे. कारखाना खाजगीकरणाकडे झुकणाऱ्या प्रकरणाला एकप्रकारे चाप लागला ही कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने हिताची बाब आहे.

श्रेयवादासाठी वाई तालुक्यातील नेत्यांवर प्रेम करणाऱ्या अनुयायांकडून फारसा प्रतिसाद प्रसिद्धी माध्यमांमध्ये दिसला नाही, गेल्या १७-१८ वर्षात आजी-माजी कारभाऱ्यांचा कारभार जनतेसमोर उघडा झाला, एकमेकांवरील आरोपांमुळे बरीचशी माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचली, कारखान्याच्या दुरावस्थेला दोघेही कसे जबाबदार आहे याची पोलखोल झाली त्यामुळे नेत्यांवर प्रेम करणाऱ्या भक्तांच्यात शांतता आहे, नाहीतर एरवी मुठभर कामाचा दुनियाभर बाजार मांडणारे समर्थक शांत बसले नसते.

किसनवीर कारखान्यावर जवळजवळ १०० कोटींचं कर्ज असल्याचे सत्ताधाऱ्यांनी अनेक वेळा सांगितलेलं आहे कारखान्यावर विविध प्रकारच्या ९ बँकांची कर्ज आहेत. जढड योजनेमार्फत सर्व बँकांची खाती निरंक करून घेणार, कारखान्याची सर्व संपत्ती राज्य सहकारी बँकेकडे तारण राहणार, दुसऱ्या बँका परत कर्ज देणार नाहीत त्यात ५४ कोटी रुपयांचे शेतकरी थकीत ऊस बिल, कामगारांचे पगार या सर्वातून किती शिल्लक राहणार हा एक संशोधनाचा विषय आहे. प्रथमतः शेतकऱ्यांची थकीत ऊस बिलं, कामगारांचा थकीत पगार व्याजासह मिळणे गरजेचे आहे अन्यथा पहिले पाढे ५५ या सदरात हे प्रकरण जाईल त्यासाठी शेतकरी वर्गाने आग्रह धरणे गरजेचे आहे, शासन दरबारी तशी मागणी करणं गरजेचं आहे नाहीतर शेतकऱ्यांच्या खिशात हात घालायला सरावलेले कारभारी पहिल्या बँकांच्या कर्जफेडीचे कारण देऊन शेतकरी व कामगारांना पुन्हा वाऱ्यावर सोडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मदन भोसले (चरवरा इंहीरश्रश) यांच्या कार्यकाळात कारखाना अडचणीत यावा म्हणून बँकांकडून, शासनाकडून मदत मिळू नये यासाठी पाटील बंधूंनी अडथळे निर्माण करत असल्याचे आरोप तात्कालीन व्यवस्थापनाकडून वारंवार झालेले आहेत, सत्ताबदल झाल्यानंतर भोसलेंनी तशा प्रकारची अडवणूक करण्याचा प्रयत्न केला नसावा, तुम्ही गाय मारली आता मी वासरू मारणार असा करंटेपणा मदन भोसले यांनी दाखवला नाही, अर्थात एक प्रकारे कारखान्याला मदतच केल्याचे प्रथमदर्शनी दिसते. आजी-माजी अध्यक्षांनी असेच गुण्यागोविंदाने राहावे म्हणजे कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना सुगीचे दिवस येतील अशीच कारखाना कार्यक्षेत्राची जनभावना आहे, येवी-तेवी दोघेही महायुतीमध्ये एकत्र आहेतच.

कारखान्याच्या दुरावस्थेला पाटील व भोसले दोघेही तेवढेच जबाबदार आहेत, मागील ५-७ वर्षात शेतकऱ्यांना जो त्रास सहन करावा लागला तो या मदतीच्या कित्येक पट अधिक आहे, तो भरून काढायची जबाबदारी यांचीच आहे त्यामुळे श्रेयवादासाठी कोणीही ऊर बडवायची गरज नाही.

तालुक्यात कारखान्याव्यतिरिक्त अनेक प्रश्न कित्येक वर्षे तसेच प्रलंबित आहेत. तालुक्यातील पाण्याची कवठे केंजळ योजना, पश्चिम भागातील जललक्ष्मी योजना, पर्यटन, आरोग्य व शिक्षण क्षेत्रात कमालीची दुरावस्था आहे, मग सलग पंधरा वर्षात तालुक्याचे आमदार मकरंद पाटलांनी नक्की काय काम केलं हा प्रश्न कार्यक्षेत्रातील शेतकरी विचारताना दिसतात ही वस्तुस्थिती आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अधिवेशनात सरकारने वारेमाप योजना जाहीर करून ठेवल्यात, शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार सहाय्य, शेतीपंप विज बिल पूर्ण माफी, दुष्काळ मदत, शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा, अन्नपूर्णा योजना, शुभमंगल योजना, महिलांना पिंक रिक्षा, लखपती दीदी त्यात कारखान्यांना थकहमी आहेच ह्या सर्व योजना व्यवहारी आहेत का हे पाहण्यासाठी समिती स्थापन होणार त्यानंतर अंमलबजावणी होणार त्यामुळे तज्ज्ञांकडून याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. ही मदत खरच मिळणार आहे का अन्यथा गाजराची पुंगी वाजली तर ठीक नाहीतर मोडून खाल्ली. किसनवीर कारखान्याला प्रत्यक्ष मदत तात्काळ मिळेल अशी अपेक्षा करूयात त्यातला त्यात प्राधान्याने शेतकऱ्यांची मागील व चालू थकीत ऊस बिलं व कामगारांचे पगार व्याजासकट मिळावेत म्हणजे कार्यक्षेत्रातील शेतकरी व कामगार भरून पावेल, तेव्हा कुठे खऱ्याअर्थाने गंगेत घोडं न्हालं म्हणावं लागेल.

**- कल्याण पिसाळ देशमुख**

# मुख्यमंत्री वैद्यकीय निधी कक्षाने वाचवले ३५ हजार रुग्णांचे प्राण

**सातारा :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या वैद्यकीय सहायता निधी कक्षा द्वारे गेल्या दोन वर्षात महाराष्ट्रातील ३५ हजार रुग्णांचे प्राण वाचवण्यात आले आहेत. या कक्षाद्वारे गेल्या २ वर्षात २७५ कोटीची वैद्यकीय मदत करण्यात आली आहे अशी माहिती या विभागाचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी दिली आहे .

सातारा येथील शासकीय विश्रामगृहामध्ये पत्रकारांशी चिवटे यांनी संवाद साधला .ते म्हणाले अडीच वर्षांपूर्वी महाविकास आघाडीच्या दरम्यान वैद्यकीय मदत कक्ष मृतावस्थेत होता .मात्र महाराष्ट्रात सत्तांतर झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री वैद्यकीय




सहायता निधी कक्षाची स्थापना करण्यात आली .यामध्ये दुर्धर आजारातील रोगांवरील उपचार तसेच विविध शारीरिक अवयवांचे प्रत्यारोपण याकरिता एक लाख रुपयांची मदत करण्यात येते यासाठी विहित अर्ज नमुन्यात, वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र आवश्यक, तहसीलदार कार्यालयाच्या वार्षिक उत्पन्नाचा दाखला ,रुग्णांचे आधार कार्ड, लहान बाळासाठी आईचे आधार कार्ड, रुग्णाचे रेशन कार्ड ,आजाराचे रिपोर्ट, अपघातग्रस्त रुग्णांसाठी पोलीस डायरी रिपोर्ट, प्रत्यारोपणासाठी शासकीय समितीची मान्यता आणि पेपर स्कॅन करून पीडीएफ फाईल ईमेल आयडी वर पाठवणे अशा अटींची पूर्तता करावी लागते याशिवाय इतर आजारासाठी सहाय्यता कक्षाच्या वतीने २०००० रुपयाची मदत करण्यात येते या योजनेद्वारे महाराष्ट्रातील ३५ हजार रुग्णांचे प्राण वाचवण्यात या कक्षाला यश आले आहे.

महाविकास आघाडीच्या काळात या कक्षामध्ये दोन वर्षात केवळ अडीच कोटींची मदत झाली होती मात्र महायुतीचे शासन आल्यानंतर तब्बल २ वर्षात २७५ कोटीची वैद्यकीय मदत देण्यात आली ८६५०५६७५६७ या टोल फ्री क्रमांकवर रुग्णांनी संपर्क करावयाचा आहे .तसेच संबंधित खाजगी रुग्णालयांमध्ये या योजनेत समाविष्ट होण्याची प्रक्रिया निशुल्क आहे . ना वशीला नाव ओळख थेट मिळते मदत ही पंचलाईन योजनेसाठी प्रसिद्ध असून रुग्णांनी कोणालाही मध्यस्थी न करता थेट टोल फ्री क्रमांक वर संपर्क साधावा असे आवाहन मंगेश चिवटे यांनी केले आहे.

# तहसिल कार्यालयातील शेडची दुरुस्ती



**सातारा :** सातारा तहसिल कार्यालयामधील सेतू सुविधा केंद्राच्या शेडवरील खराब झालेले पत्र्याची पाने बदलण्याचे आणि डागडुजी करण्याचे काम गुरुवारी करण्यात आल्याची माहिती सातारा तहसिलदार नागेश गायकवाड यांनी दिली.

मागील काही दिवसांपासून तहसील कार्यालयातील सेतू केंद्राची दुरावस्था झाली होती. त्यामुळे त्या ठिकाणी दाखल्यासाठी येणारे विद्यार्थी पालक यांना बराच त्रास सहन करावा लागत होता कारण गळत होता. तसेच पालापाचोळा साठत असल्यामुळे तो खाली पडल्यामुळे शेडच्या आत मध्ये चिखलाचे साम्राज्य तयार होत होतं त्यामुळे नागरिकांचे घसरण्याचे प्रसंग वारंवार घडत होते. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता.

याबाबत तहसीलदार नागेश गायकवाड यांच्याकडे याविषयीच्या तक्रारी गेल्या असता त्यांनी ताबडतोब आषाढी एकादशीच्या दिवशी गुरुवारी सेतू केंद्रावरील १३ पत्रे काढून नवीन बसवण्यात आले. तसेच साफसफाई करण्यात आली. आणि सेतू सुविधा केंद्रातील शेडमध्ये २ ट्यूबलाईट बसविण्यात आल्याची माहिती यावेळी तहसीलदार नागेश गायकवाड यांनी दिली.

# राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेत के. एस.डी शानभाग विद्यालयाचे यश

**सातारा :** येथील श्यामसुंदरी चॅरिटेबल अँड रिलीजियस सोसायटीचे के. एस. डी शानभाग विद्यालय आणि कला,वाणिज्य व विज्ञान शाखेच्या महाविद्यालयाच्या खेळाडूंने नुकत्याच अमरावती येथे झालेल्या महाराष्ट्र आर्चरी असोसिएशन द्वारे आयोजित राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये कु. वेदिका विनोद वाघ या आठवी अ मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थिनीने उत्कृष्ट कामगिरी करीत १५ वर्षे मुलींच्या वयोगटांमध्ये वैयक्तिक व एलिमिनेशन प्रकारामध्ये सुवर्णपदक प्राप्त केले,तसेच सांघिक प्रकारामध्ये सुवर्ण व रौप्य पदक प्राप्त करीत एकूण चार पदके आपल्या नावे नोंदविली.

पुढील महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय आर्चरी स्पर्धेसाठी तिची निवड करण्यात आलेली आहे. तिला आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक प्रवीण सावंत यांचे मार्गदर्शन लाभले व प्रशिक्षक सुधाकर पळसे यांचे सहकार्य मिळाले.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे संस्थापक व ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक रमेश शानभाग संस्थेच्या संचालिका सौ.आँचल घोरपडे, विश्वस्त सौ. उषा शानभाग, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.रेखा गायकवाड, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भाग्येश कुलकर्णी, क्रीडा विभागप्रमुख अभिजीत मगर, पालक संघाचे प्रतिनिधी आणि शिक्षक शिक्षकांसह,कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# डॉल्बीच्या दणदणाटात सर्जा राजांनी अनुभवला बेंदूर सणाचा थरार

**सातारा :** दरवर्षी आषाढ महिन्यातील मूळ नक्षत्रावर साजरा होणाऱ्या बैल बेंदूर सणाचा उत्साह यावर्षी काही औरच होता. दरवर्षी हा सण भर पावसात साजरा केला जातो याही वर्षी संततधार पावसाने या सणाचा उत्साह मात्र काही कमी झाल्याचे दिसून येत नव्हते. सातारा शहरातील समर्थ मंदिर रोडवरील माने परिवाराने आपल्या घरातील सर्व बैल जोड्या सकाळीच नाऊ माखू घातल्या त्यांना विविध रंगांनी सजवले .त्यांच्या शिंगांना मोरपिसे ,बेगड, जुली घातल्या ,फुलांचे हार घातले आणि त्यानंतर पुरणपोळीचा नैवेद्य दाखवत त्यांना गोडधोड खाऊ घालून सायंकाळी सहा वाजता भर पावसात या सर्जा -राजा आणि ढवळ्या- पवळ्या बैलांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.



**समर्थ मंदिर परिसरातील माने कुटुंबीयांकडून भर पावसात बैलजोड्याची भव्य मिरवणूक .**

बैलांपेक्षा यात सहभागी झालेल्या युवा कार्यकर्त्यांचा उत्साहच अधिक दांडगा होता. तो म्हणजे या मिरवणुकीसाठी आणलेल्या दणदणाटात डॉल्बी सिस्टीमचा विविध रंगांची नकाशी ,लेझर लाईट मधून उतरून मधूनच उडणारे धुराचे फवारे आणि त्यात विविध भाषेतील गाण्यांवर फरकणारी पावले खऱ्या अर्थाने या बैल जोड्यांना मात्र बुजवतच होती .

आपल्या सणाला ही सर्व युवामंडळी नाचून धमाल करत आहेत. मात्र या दणदणाटात आणि कर्कश्य आवाजाने आमची मात्र गाळण उडत असल्याची मनोभावनात हे बैल व्यक्त करताना दिसत होते .हातात वेसण ठरलेल्या आणि या बैलजोड्यांना सावरणाऱ्या माने परिवारातील सदस्यांना मात्र या मिरवणुकीत दणदणाटा मुळे अक्षरशः नाकीनऊ येत होते .त्यातच परिसरातील अनेक सातारकरांनी या बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य घालून त्यांची मनोभावे पूजा करत वृषभ देवाची ही अनोखी पूजा आणि मिरवणूक आपल्या घरापुढून जात असल्याचे पाहून आनंद व्यक्त केला मिरवणूक सुरू होताना ही डॉल्बीतली दणदणाटाची मिरवणूक पाहण्यासाठी परिसरातील सुमारे हजारांहून जास्तच युवा मंडळी या मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी परिसरात जमा झाल्याचे चित्र होते.

समर्थ मंदिर रोडवरून निघालेली ही मिरवणूक वाजत, गाजत रात्री उशिरा राजवाडा मार्गे मोती चौक, देवी चौकातून पुन्हा घराकडे परत आल्यावर या बैल जोड्यांचे घरच्या सुवासिनीने औक्षण करून हा बेंदराचा सण मोठ्या थाटात आणि उत्साहात साजरा केला .

# छत्रपती संभाजीराजे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची खासदार उदयनराजे यांच्याकडून पाहणी

सातारा : स्वराज्याचे दुसरे छत्रपती असलेल्या स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजीमहाराज यांच्या गोडोली तळे परिसरात उभारण्यात येणा-या पूर्णाकृती पुतळयाच्या प्रतिकृतीची पहाणी आज खासदार उदयनराजे भोसले यांचे समवेत छत्रपती संभाजीमहाराज स्मारक प्रतिष्ठानच्या मान्यवरांकडून, आज जलमंदिर पॅलेस येथील दरबार हॉल मध्ये करण्यात आली. पुणे येथून तयार करुन आणलेल्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळा प्रतिकृती आज जलमंदिर पॅलेस, येथे अवलोकनासाठी तसेच काही सूचना असतील तर त्या सुचविणेसाठी आणण्यात आली होती.

नगरपरिषद,सातारा आणि छत्रपती संभाजीमहाराज स्मारक प्रतिष्ठान व सर्व शाहुनगरवासियांच्या वतीने, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजीमहाराज यांचा पुतळा स्मारक उभारण्यात येत आहे. उभारण्यात येणारा, छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा कसा असेल याबाबतची प्रतिकृती तयार करण्याचे पहिल्या प्राथमिक टप्पाचे पूर्ण झाले आहे., यानंतर सदर प्रतिकृतीला शासनाच्या कला संचालनालयाची परवानगी मिळण्यासाठी प्रस्तावित केली जाणार आहे. कला संचालनालयाची परवानगी मिळाल्यावर, परवानगी मिळालेल्या प्रतिकृतीप्रमाणे हुबेहूब ब्रांझचा पुतळा तयार करण्याची प्रक्रीया सुरू केली जाणार आहे.

आदरणीय राजमाता कल्पनाराजे भोसले आणि खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या सूचनेनुसार, सातारा येथील गोडोली तळे परिसरात छत्रपती संभाजीमहाराज यांच्या पूर्णाकृती पुतळा उभारणीचा निर्णय सातारा नगरपरिषदेने घेतलेला आहे. तसेच पुतळा तयार करण्यासाठी पुणेस्थित मुर्ती कलाकार श्री. संजय परदेशी यांना नगरपरिषदेचे प्रशासक अभिजीत बापट यांनी कार्यादेश दिला आहे. सदर कार्यादेशानुसार श्री. संजय परदेशी यांनी उभारण्यात येणा-या पुतळयाची प्रतिकृती तयार करुन, त्याचे निरिक्षण तसेच काही आवश्यक बदल असल्यास तसे सूचवणे इत्यादी बाबत, सदरची प्रतिकृती सातारा येथे निरिक्षणासाठी आणली होती.

सदर प्रतिकृतीची छत्रपती संभाजीमहाराज स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांनी अत्यंत बारकाईने पहाणी केली. तसेच संभाजीमहाराज स्मारक प्रतिष्ठानच्या पदाधिकारी यांनीही प्रतिकृतीचे अवलोकन केले तसेच प्रतिकृतीच्या प्रत्येक भाग निर्माण करण्यामागील उद्देश, त्याबाबतचे सक्षम ऐतिहासिक दस्तावेजामधील पुष्टी इत्यादी बाबत, उपस्थित सर्वांनी निरिक्षण केले. तसेच आवश्यक त्या सूचना कलाकार श्री.संजय परदेशी यांना केल्या.

छत्रपती संभाजीमहाराज यांचा २५ फुट उंचीचा भव्य पुतळा साता-यात उभा रहात आहे. मराठयांच्या राजधानीमध्ये छत्रपती संभाजीमहाराज यांचा कोठेही पुतळा नव्हता याची आमचेसह शिवशंभुप्रेमींच्या मनात खंत होती. ती खंत किंवा उणिव आता दूर होत आहे. या पुतळा उभारणीच्या महत्वपूर्ण कार्यात सर्वांचेच योगदान आहे. सातारकरांनाच नव्हे तर जिल्हावासियांना सतत धगधगत्या इतिहासाची प्रेरणा साक्ष देणारा हा पुतळा, सुनियोजित पध्दतीने, लवकरच उभारला जाणार आहे याचे विशेष समाधान एक सातारकर म्हणून आम्हास आहे. आज प्रतिकृतीमध्ये काही सूचना केल्या आहेत. त्यानुसार आवश्यक ते बदल करुन, ही प्रतिकृती शासनाच्या कला संचालनालयाकडे पाठविली जाईल. या संचालनालयामार्फत योग्य ती पडताळणी झाल्यावर, त्यास मान्यता मिळाल्यावर, २५ फुट उंचीचा ब्रांझ धातुमध्ये पुतळा तयार करण्याचे काम हाती घेण्यात येईल.

या उभारणीमध्ये छत्रपती संभाजीमहाराज स्मारक प्रतिष्ठानचे पदाधिकारी/ सदस्य सातत्याने आवश्यकते लक्ष आणि पाठपुरावा करीत आहेत. लवकरच गोडोली नाका म्हणून ओळखल्या जाणा-या परिसराला वेगळे आयाम प्राप्त होतील असेही खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांनी यावेळी अनौपचारिक बोलताना सांगीतले.

याप्रसंगी मुर्तीकलाकार संजय परदेशी, शैलेश वरखडे, यांचेबरोबर प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष व जेष्ठ पत्रकार हरिष पाटणे, सचिव विलासनाना शिंदे, जेष्ठ पत्रकार आणि मार्गदर्शक जीवनधर चव्हाण आणि शरद काटकर, माजी उपाध्यक्ष मनोज शेंडे, चंद्रकांत पाटील, युवानेते संग्राम बर्गे, माजी सभापती सुनीलतात्या काटकर, जेष्ठ पत्रकार विनोद कुलकर्णी, अभिजीत बारटक्के, सुजित जाधव, अमोल तांगडे, ईर्शाद बागवान, काका धुमाळ यांचेसह शिव-शंभु प्रेमी उपस्थिती होती.

## मक्याचा खडखडाट, प्रतिकिलो ३० रुपयांवर

**पुणे :** देशभरात गेल्या वर्षी कमी पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे मका उत्पादनात घट झाली आहे. दुसरीकडे कुक्कुटपालन, पशुखाद्य, प्रक्रिया उद्योग, कापड उद्योग आणि इथेनॉल निर्मितीसाठी मक्याच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे बाजारात मक्याचा खडखडाट आहे. मकाटंचाईचा मोठा फटका कुक्कुटपालन व्यवसायाला बसत आहे.

देशात दर वर्षी सरासरी ३५० ते ३८० लाख टन मक्याचे उत्पादन होते. तर देशांतर्गत मक्याची मागणी सुमारे ४०० लाख टन आहे. त्यामुळे दर वर्षी मक्याचा काही प्रमाणात तुटवडा असतोच. खरीप आणि रब्बी हे मका उत्पादनाचे दोन प्रमुख हंगाम असले, तरीही देशाच्या कोणत्या ना कोणत्या राज्यात जवळपास वर्षभर मक्याची लागवड होते. त्यामुळे मागणी - पुरवठ्याची साखळी वर्षभर सुरू असते. पावसाळ्याच्या पहिल्या टप्प्यात दर वर्षी बिहारमधील मका देशभराची गरज पूर्ण करतो. बिहार सरकारने जैवइंधनाला प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे बिहारच्या मक्याला बिहारमधूनच मागणी वाढली आहे.

# खासदार बालिश आहेत, त्यांच्याकडे प्राथमिक माहिती सुद्धा नाही; सतेज पाटलांचा महाडिकांवर हल्लाबोल

**कोल्हापूर :** विशाळगडाच्या पायथ्याला १४ जुलै रोजी गजापुरात झालेल्या हिंसाचारानंतर पाहण्यासाठी गेलेल्या खासदार शाहू महाराज यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. या व्हिडिओवरून आता काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा आमदार सतेज पाटील यांनी हल्लाबोल केला आहे. भाजपच्या आयटी सेलने खोटा व्हिडिओ व्हायरल केला असून त्या व्हिडिओबाबत आम्ही गुन्हा दाखल करणार असल्याचे सतेज पाटील यांनी म्हटलं आहे. त्या व्हायरल व्हिडिओवर पाटील यांनी नेमका काय प्रकार घडला याबाबत सांगितलं. पाटील यांनी गजापूर गावातील लोकांनी तीन दिवस अगोदरच अशी काही घटना होईल आणि आमच्या गावाला संरक्षण द्या अशी मागणी केली होती, असा दावा केला. इंडिया आघाडीकडून आज कोल्हापुरात शाहू महाराजांच्या समाधीस्थळ ते शिवाजी चौक अशी सद्भावना रॅली काढण्यात आली.

खासदार बालिश आहेत, त्यांच्याकडे प्राथमिक माहिती सुद्धा नाही

दरम्यान, सतेज पाटील यांनी खासदार धनंजय महाडिक यांनी केलेल्या टीकेला सुद्धा प्रत्युत्तर दिले. खासदार बालिश आहेत, त्यांच्याकडे प्राथमिक माहिती सुद्धा नाही अशी टीका त्यांनी केली. आम्ही मदत विशाळगडावर केली असं त्यांना वाटतं, आम्ही मदत गजापुरात हिंसाचारग्रस्त इंडिया आघाडीकडून केली. अज्ञान असलं की अशी वक्तव्ये येतात, असे ते म्हणाले.

शाहू महाराज ऐकू येण्यासाठी ती कृती करत होते

सतेज पाटील म्हणाले, की विशाळगडावर महिलांच्या कानातील सुद्धा काढून घेतले असे त्या सांगत होत्या. शाहू महाराज ऐकू येण्यासाठी ती कृती करत होते. महाराज मला सांगत होते की कानातलं सुद्धा काढून घेतले. मात्र, याचा विपर्यास करून ज्या पद्धतीने देशपातळीवर व्हिडिओ व्हायरल करण्यात आला त्याबाबतीत आम्ही रितसर गुन्हा दाखल करणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.

अजित पवारांच्या दौऱ्यावर काय म्हणाले ?

दरम्यान, गेल्या चार दिवसांपासून विशाळगड होरपळत असताना आज प्रथमच सरकारचा प्रतिनिधी गडाच्या पायथ्याशी पोहोचला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विशाळगड दौरा केला. या दौऱ्यावरून पाटील यांना विचारण्यात आले असता आम्हाला ते आल्याचे माहीतच नाही. प्रसारमाध्यमातून समजल्याची खोचक प्रतिक्रिया सतेज पाटील यांनी दिली. शासनाची भूमिका काय आहे हे लोकप्रतिनिधी म्हणून आमच्याकडून जाणून घ्यायला हवे होते, असेही पाटील यावेळी म्हणाले.

दरम्यान झालेल्या हिंसाचाराबाबत बोलताना पाटील म्हणाले की कोल्हापूरमध्ये झालेली दंगलीमध्ये बाहेरून आलेले लोक होते आणि आता पुण्यातून सुद्धा रवींद्र पडवळ बाहेर पडला आहे. यंत्रणेला माहीत होते त्याचवेळी कारवाई करायला हवी होती अशी टीका त्यांनी केली. ते पुढे म्हणाले की सामाजिक वातावरण बिघडवणारे दंगलींचे प्रकार राजर्षी शाहू महाराजांच्या भूमीतच का घडत आहेत याची चौकशी पोलिस करत नसल्याचे ते म्हणाले.

# पीडितांना तात्काळ शासनाकडून नुकसान भरपाई मिळेल ; पालकमंत्री हसन मुश्रीफ



**कोल्हापूर :** विशाळगड येथील अतिक्रमण काढण्याबाबत आंदोलन करण्यासाठी आलेल्या आंदोलकांनी मौजे गजापूर मधील घरांचे व प्रार्थना स्थळाचे नुकसान केले होते. नुकसान झालेल्या भागातील पाहणी करून शासनाकडून दिलेल्या मदतीचा आढावा पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी घेतला. यावेळी गावातील ग्रामस्थ, पीडित महिला पुरुष यांचेशी त्यांनी संवाद साधला.

यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित, उपविभागीय अधिकारी समीर शिंगटे, तहसीलदार रामलिंग चव्हाण उपस्थित होते.

पालकमंत्री मुश्रीफ यांनी पीडितांना दिलासा देत शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे आहे. कोणीही घाबरुन न जाता आपापल्या कुटुंबाला सावरा असा दिलासा दिला. गावात विशाळगड सारखी कायमस्वरूपी पोलिस चौकी उभारण्याचे नियोजन करण्यात येत असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली. तसेच मा.न्यायालयाकडून अतिक्रमण काढणे बाबत दिलेल्या आदेशांचा अभ्यास करुन २९ जुलैला होणाऱ्या पुढील सुनावणीदरम्यान प्रशासनाकडून प्रतिज्ञापत्र सादर केले जाणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

गावात तातडीची मदत म्हणून शासनाने २५-२५ हजार रुपये असे एकूण ५० हजार रुपये प्रत्येकी मदत केलेली आहे. नुकसानीबाबत पंचनामे करून २ कोटी ८५ लाख रुपयांचा नुकसान भरपाई प्रस्ताव तयार केलेला आहे. ही मदत पीडितांना लवकरात लवकर देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गावात आल्यानंतर ही मदत तातडीने देणार असल्याचे जाहीर केले होते.

# विधानपरिषदेत क्रॉस व्होटिंग करणाऱ्या आमदारांवरील कारवाई गुलदस्त्यात !



**मुंबई :** विधान परिषद निवडणुकीत पक्षाच्या ज्या आमदारांनी क्रॉस व्होटिंग केले त्यांच्यावर पक्षाने कारवाई केली असून, काही दिवसांत आपल्याला त्याची माहिती मिळेल. पक्षात बेशिस्त खपवून घेतली जाणार असा इशारा अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी काँग्रेस कार्यकत्यांना दिला. काँग्रेस पक्षाच्या प्रमुख नेत्यांची बैठक आज गरवारे क्लब येथे पार पडली त्यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली मात्र कोणत्या आमदारांवर काय कारवाई केली याची माहिती गुलदस्त्यात आहे.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे संघटन सरचिटणीस खासदार के. सी. वेणुगोपाल व महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली गरवारे क्लब येथे काँग्रेस पक्षाच्या प्रमुख नेत्यांची बैठक आज पार पडली. या बैठकीला विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मुकुल वासनिक, अविनाश पांडे, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खा. वर्षा गायकवाड, विधान परिषदेतील गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव मोघे, नसीम खान, खा. चंद्रकांत हंडोरे, खा. प्रणिती शिंदे, आ. कुणाल पाटील, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, सरचिटणीस प्रमोद मोरे, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे आदी उपस्थित.

बैठकीनंतर पत्रकारांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना खा. के. सी. वेणुगोपाल म्हणाले की, विधान परिषद निवडणुकीत पक्षाच्या ज्या आमदारांनी क्रॉस व्होटिंग केले त्यांच्यावर पक्षाने कारवाई केली असून काही दिवसांत आपल्याला त्याची माहिती मिळेल. पक्षात बेशिस्त खपवून घेतली जाणार असेही त्यांनी ठणकावले.

वेणुगोपाल म्हणाले की, राज्यातील महाभ्रष्ट महायुती सरकार सत्तेतून बाहेर काढणे हा काँग्रेस पक्षाचा संकल्प आहे. भारतीय जनता पक्षाने लोकसभा व विधानसभा पोट निवडणुकीतही सरकारी यंत्रणांचा मोठ्या प्रमाणात गैरवापर केला. पण तरीही त्यांचा पराभव झाला. भाजपाचा अयोध्येनंतर बद्रिनाथमध्येही जनतेने पराभव केला आहे. महाराष्ट्रातील स्वाभिमानी जनताही राज्यातील भ्रष्ट आणि असंवैधानिक सरकारला सत्तेवरून खाली खेचून परिवर्तन करणार आहे असे चित्र राज्यात आहे.

जनतेला महाराष्ट्रातही परिवर्तन हवे आहे. महाविकास आघाडी विधानसभेच्या निवडणुका एकत्र लढणार असून तीन पक्ष एकत्रित बसून जागावाटपाची चर्चा करणार आहेत. आम्ही मिळून या विधानसभा निवडणुकीत राज्यातील महाभ्रष्ट महायुती सरकार सत्तेतून उखडून फेकू, असा निर्धार आजच्या बैठकीत आम्ही केला असे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल म्हणाले.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, या बैठकीत विधानसभा तयारीसंदर्भात बैठकीत चर्चा करण्यात आली. काँग्रेस पक्ष संविधान लोकशाही व महाराष्ट्राच्या स्वाभिमानाच्या रक्षणाची लढाई करणार आहे. आम्ही महाराष्ट्राला गुजरातचा गुलाम होऊ देणार नाही. महाराष्ट्राची संपत्ती आणि मुंबई गुजरातला विकू देणार नाही. २० ऑगस्ट रोजी माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. राजीवजी गांधी यांची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी केली जाणार असून काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. मल्लिकार्जून खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी हे उपस्थित राहणार असून याच दिवशी विधान सभेच्या प्रचाराचा नारळ फोडणार आहे. महाराष्ट्राची वाट लावणा-या महाभ्रष्ट युती सरकारला सत्तेतून बाहेर काढणे हाच काँग्रेसचा संकल्प आहे.

# भाजपचे मिशन विधानसभा दि.२१ जूलैला पुणे येथे अधिवेशन !

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजप सज्ज झाली आहे त्यासाठी जवळपास ९७ हजार बूथ, शक्तीकेंद्र तसेच मंडल स्तरावर संघटना सक्षमीकरणाला प्राधान्य देणार आहे अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. यावेळी प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश सहमुख्य प्रवक्ते आशीष देशमुख, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये सर्व शक्तिनिशी महायुती एकत्रितरित्या उतरणार असून महायुतीला मोठा विजय मिळेल असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. तसेच २१ जुलै रोजी पुणे येथे पक्षाचे अधिवेशन होणार आहे. अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात ज्येष्ठ नेते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे मार्गदर्शन होणार आहे. केंद्रीय गृह मंत्री अमित शाह हे या अधिवेशनाचा समारोप करणार असल्याची माहितीही बावनकुळे यांनी दिली.

बावनकुळे म्हणाले की विधानसभा निवडणुकीसोबतच भाजपा, पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्राम पंचायत आणि महापालिका निवडणुकांच्या तयारीला लागणार आहे. या बाबतची विस्तृत योजना गुरुवारी झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत आखली गेली आहे. विधानसभा निवडणुकीबरोबरच पंचायत समिती, नगर पालिका आणि महापालिका स्तरावरील नेत्यांना यथायोग्य जबाबदारी दिली जाणार आहे. महायुतीच्या सर्वसमावेशक अर्थसंकल्पातील विशेष तरतुदी समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याची योजना कोअर कमिटीच्या बैठकीत ठरवण्यात आली तसेच डबल इंजिन सरकारचा अधिकाधिक लाभ राज्यातील जनतेला कसा करून देता येईल याचीही चर्चा झाल्याचे ते म्हणाले.

गुरुवारी झालेल्या बैठकीत मित्रपक्षांबाबत कुठल्याही प्रकारची चर्चा, टिप्पणी भाजपाच्या नेत्यांनी केली नसताना माध्यमांमधून चुकीच्या बातम्या देत महायुतीमध्ये जाणीवपूर्वक ठिणगी पाडण्याचे काम करण्यात आले, अशी खरमरीत टीकाही बावनकुळे यांनी केली. बैठकीत झालेल्या चर्चेबाबत पक्षाकडून माहिती दिली जाते. जे घडलेच नाही ते घडल्याची बातमी देणे माध्यमांनी थांबवावे अशी विनंतीही श्री. बावनकुळे यांनी केली. अशा चुकीच्या बातम्यांसंदर्भात पक्ष संघटनेत नाराजी असल्याचेही बावनकुळे यांनी स्पष्ट शब्दात सांगितले. राज्यातील माध्यमांना एक विशीष्ट उंची आणि संस्कार आहेत ते अबाधित ठेवून वृत्तांकन व्हायला हवे असेही त्यांनी नमूद केले.

# शिवसेनेची विधानसभेसाठी रणनीती ठरली

**मुंबई :** राज्यात पुढील तीन ते चार महिन्यात आगामी विधानसभा निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीसाठी महाविकास आघाडी आणि महायुतीकडून मोर्चेबांधणी आणि रणनीती आखली जात आहे. तर किती जागा लढवायच्या? किती जागावर आपण जिंकून येऊ शकतो? यावर देखील राजकीय पक्षांकडून चाचपणी सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या पक्षाची बैठक वर्षा निवासस्थानी घेतली. या बैठकीला पक्षाचे आमदार, मंत्री आणि पदाधिकारी उपस्थित होते.

१०० जागा लढवणार : विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना (शिंदे गटाकडून) १०० जागा लढविण्यात येणार आहेत. यावर बैठकीत चर्चा झाली. तसंच महायुतीत शिवसेना पक्षाने १०० जागा लढवाव्यात यावर देखील पक्षातील नेत्यांचं एकमत झाल्याची माहिती समोर येत आहे. या १०० जागांसाठी १०० निरीक्षकांची नियुक्ती करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिले. याचबरोबर प्रभारींची देखील नियुक्ती करण्यात यावी. निरीक्षक आणि प्रभारी यांनी शंभर जागावर विशेष लक्ष द्यावं, असं आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीत नेत्यांना दिल्याचं समजतं.

बैठकीत काय झाले : विधानसभा निवडणूक ही पक्षासाठी अतिशय महत्त्वाची आहे. कारण नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पक्षाला चांगले यश मिळाले आहे.

# दुधाला हमीभाव देण्यासाठी मंत्री विखे पाटील यांची केंद्राकडे मागणी

**मुंबई :** शेती उत्पादीत मालाप्रमाणेच दूध उत्पादक शेतक-यांसाठी केंद्र सरकारने दूधाला आधारभूत किंमत ठरवून देण्याबाबतचा कायदा तातडीने करावा अशी मागणी केंद्रीय सहकार मंत्री अमीत शाह यांच्याकडे दूग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली आहे.

या संदर्भात केंद्रीय मंत्री अमीत शाह यांना मंत्री विखे पाटील यांनी दूग्ध व्यवसाया संदर्भात सविस्तर पत्र दिले असून, राज्यातील दूध व्यवसायाची सद्य परिस्थिती, दूध उत्पादक शेतक-यांच्या असलेल्या मागण्या आणि राज्य सरकारने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांची माहीती या पत्राव्दारे करुन दिली आहे. इतर शेती उत्पादना प्रमाणेच दूधाला देखील आधारभूत किंमत देण्याबाबत केंद्र सरकारने निर्णय केल्यास याचा मोठा दिलासा दूध उत्पादक शेतक-यांना तसेच या व्यवसायाला मिळेल असा विश्वास मंत्री विखे पाटील यांनी पत्रातून व्यक्त केला आहे.

राज्यातील ग्रामीण भागात दूध व्यवसायातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे.

छोटे शेतकरी, महीला आणि युवकांचे या व्यवसायात मोठे योगदान असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला या व्यवसायातून मोठे पाठबळ मिळाले असल्याचे नमुद करुन, उन्हाळी आणि हिवाळी हंगामात मोठ्या प्रमाणात दूधाचे उत्पादन होते. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारात दूध पावडर आणि बटर यांच्या किमती घसरल्याने याचा परिणाम दूधाच्या किमतीमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येतो. दूध दरातील या चढ उताराचा मोठा सामना शेतक-यांनाही करावा लागतो. ही वारंवार उद्भवणारी लक्षात घेवून दूध उत्पादकांना दिलासा देण्याचा निर्णय तातडीने होणे गरजेचे असल्याचे ना.विखे पाटील यांनी केंद्रीय मंत्री अमीत शाह यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

या सर्व संकटात दूध उत्पादक शेतक-यांना दूध संघाकडून मिळणारा दर अत्यंत कमी आहे. ही परिस्थिती लक्षात घेवून राज्यातील महायुती सरकारने प्रतिलिटर ३० रुपये दर संघानी देण्याबाबत व ५ रुपयांचे अनुदानही देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या माध्यमातून दूध उत्पादक शेतक-यांना ३५ रुपये दर मिळावा हा प्रयत्न सरकारचा आहे.



# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून छुपा प्रचार

**रत्नागिरी :** महायुती सरकारतर्फे राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला महिला वर्गातून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला आहे. परंतु, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष व प्रवक्ते अजित यशवंतराव यांनी या योजनेच्या नावाखाली रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत आपल्या लाडक्या भावाचा छुपा प्रचार करत असल्याचा आरोप केला आहे. राजापूर आणि लांजा येथे महिला वर्गासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमांना स्वतः रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी हजेरी लावली होती. कार्यक्रमांच्या दरम्यान त्यांनी आपल्या भावाचा उघड प्रचार केल्याचे आरोप राष्ट्रवादीचे अजित मंदा यशवंतराव यांनी केले आहेत. मंडा यांच्या मते, सामंत यांनी या कार्यक्रमांसाठी महायुतीतील मित्र पक्षांना विचारात घेतले नाही, ज्यामुळे सर्व मित्र पक्ष नाराज झाले आहेत. या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने महिलांचा सहभाग होता. योजनेच्या माध्यमातून महिलांना विविध प्रकारचे लाभ देण्यात आले. परंतु, या योजनेच्या माध्यमातून सामंत यांनी आपल्या भावाचा प्रचार केल्यामुळे योजनेच्या उद्देशावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राजापूर आणि लांजा येथे आयोजित कार्यक्रमांमध्ये सामंत यांनी आपल्या भावाचे नाव घेऊन त्याचा प्रचार केल्याचा आरोप आहे. अजित यशवंतराव यांच्या मते, या योजनेचे नाव घेऊन पालकमंत्री उदय सामंत आपल्या भावाला पुढे आणण्याचा प्रयत्न करत आहेत. या प्रकारामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील महायुतीतील घटक पक्ष नाराज असून, या योजनेच्या माध्यमातून कौटुंबिकीकरण सुरू असल्याचे अजित यशवंतराव यांनी म्हटले आहे.

महायुती सरकारमधील रत्नागिरी जिल्ह्यातील उदय सामंत यांनी सुरु केलेल्या योजनेसाठी घटक पक्षांना डावलत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेखाली आपला लाडका भाऊ जबरदस्तीने जनतेवर लादण्याचा प्रकार पालकमंत्री उदय सामंत करत असल्याचा आरोप राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष अजित व प्रवक्ते अजित यशवंतराव यांनी केला आहे. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील महायुतीतील घटक पक्षांमध्ये असंतोष वाढला आहे.

# संविधानाची हत्या कुणीही करू शकत नाही

## माजी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी

**मुंबई :** गेल्या दोन तीन महिन्यापासून संविधान बाबतची सुरू असलेली चर्चा मी ऐकत होतो. मात्र संविधानाची हत्या कुणीही करू शकत नाही असा विश्वास मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे दिवंगत पत्रकार दिनू रणदिवे स्मृती पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना दिला.



धर्माधिकारी म्हणाले, वृत्तपत्राची पाहिली तीन चार पाने का वाचावीत असा प्रश्न पडला आहे. महापुरुष छोट्या कारणावरून भांडत नव्हते. त्यांचे लोकांवर प्रेम होते. त्यांचे योगदान फोल ठरत असल्याचे आज वातावरण तयार झाले आहे. संपादक पदी बढती मिळण्यापेक्षा दिनू रणदिवे यांना मिळालेला हा मान त्यापेक्षाही मोठा आहे असे धर्माधिकारी म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. भालचंद्र मुणगेकर म्हणाले, मधू कांबळे यांची पत्रकारिता मी जवळून पाहिली आहे. समाजाचे ज्वलंत प्रश्न आंदोलन मोर्चे दलीत समाज आदी सर्व विषयावर त्यांची पत्रकारिता होती.

यावेळी मधू कांबळे म्हणाले, देशाची बिघडलेली स्थिती सुधारण्यासाठी सज्जनांनी सक्रिय होण्याची गरज आहे.मी पत्रकारितेच्या नोकरीतून निवृत्त झालो आहे. पत्रकारितेतून नाही. सरन्यायाधीश ज्यावेळी असे म्हणतात की, भारताच्या न्याय व्यवस्थेला धोका आहे. तेव्हा त्या विधानाची रॉ किंव्हा सी बी आय मार्फत चौकशी झाली पाहिजे होती. मात्र तसे झाले नाही.

मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण म्हणाले, पत्रकार दिनू रणदिवे यांच्या बँक खात्यात किती रुपये होते यापेक्षा त्यांनी त्यांच्या जीवनात करोडो माणसे जोडली व माणसांची बँक जोपासली म्हणून आज या पुरस्कार सोहळ्यात एवढी गर्दी झाली आहे. दिनू रणदिवे आमच्या विचारत ३६५ दिवस आहेत. पत्रकारांना त्यांचे आज जे काही हक्क अधिकार मिळत आहेत ते दिनू रणदिवे यांच्यामुळेच मिळत आहेत.

प्रेस क्लब चे माजी अध्यक्ष गूरबिर सिंग म्हणाले, भविष्यात पुरस्कार देण्यासाठी चांगले पत्रकार मिळतील का ? कुठे चालली आहे आजची पत्रकारिता ? असे अनेक प्रश्न त्यांनी मांडले. उत्तर प्रदेश मध्ये चार हजार यु टुब वर बातम्या देणाऱ्या संपादकांची मुस्कटदाबी केली गेली . मात्र त्यानंतर आठ हजार नवीन यु टुब वर बातम्या देणारे संपादक निर्माण झाले.

# साईंच्या शिर्डीत असा होणार तीन दिवसीय गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

## भाविकांसाठी मंदिर राहणार रात्रभर खुले

**शिर्डी (अहमदनगर) :**

साईबाबा संस्थानच्यावतीने शनिवार, २० जुलै ते सोमवार, २२ जुलै २०२४ या काळात गुरूपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या उत्सवाच्या तीन दिवसात तब्बल ६ लाख भाविक साईंच्या दर्शनासाठी येणार असल्याचं साईबाबा संस्थानच्यावतीनं सांगण्यात आलय. साईबाबा हयात असल्यापासून गुरुपौर्णिमा शिर्डीत मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. त्यामुळे या दिवसाला आजही अनन्यसाधारण महत्त्व आहे. साईबाबांवर श्रध्दा असणारे असंख्य भाविक दरवर्षी गुरुपौर्णिमेला शिर्डीला येऊन समाधीचे दर्शन घेतात आणि या उत्सवास हजेरी लावतात. याही वर्षी गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन साईबाबा संस्थानच्यावतीनं करण्यात आलं आहे.



उत्सवाचा पहिला दिवस : उत्सवाच्या प्रथम दिवशी शनिवार दिनांक २० जुलै पहाटे ०५.१५ वाजता श्रींची काकड आरती, ०५.४५ वाजता श्रींचे फोटो आणि पोथीची मिरवणूक, ०६.०० वाजता व्दारकामाईत श्री साईसच्चरित्राचे अखंड पारायण, ०६.२० वाजता श्रींचे मंगलस्नान व दर्शन, सकाळी ०७.०० वाजता श्रींची पाद्यपूजा, सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत पद्मश्री मदन चव्हाण यांचा साईभजन कार्यक्रम, दुपारी १२.३० वाजता श्रींची माध्यान्ह आरती, दुपारी ०१.०० ते ०३.०० या वेळेत भुवनेश नैथानी, दिल्ली यांचा साईभजन कार्यक्रम, दुपारी ४.०० ते ६.०० या वेळेत ह.भ.प.श्री मंदार व्यास, डोंबिवली यांचा कीर्तन कार्यक्रम, सायंकाळी ०७.०० वा. श्रींची धुपारती, ७.३० ते रात्रौ ९.३० या वेळेत श्री प्रशांत भालेकर, मुंबई यांचा स्वरधुनी साईगीतांचा कार्यक्रम, रात्री ०९.१५ वाजता श्रींच्या पालखीची गावातून मिरवणूक होणार आहे. पालखी मिरवणूक परत आल्यानंतर रात्री १०.०० वाजता श्रींची शेजारती होईल. या दिवशी पारायाणासाठी द्वारकामाई मंदिर रात्रभर उघडं राहील.

उत्सवाचा मुख्य दिवस : उत्सवाच्या मुख्य दिवशी रविवार दिनांक २१ जुलै रोजी पहाटे ०५.१५ वाजता श्रींची काकड आरती, ०५.४५ वाजता अखंड पारायण समाप्ती, श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक, ०६.२० वाजता श्रींचे मंगलस्नान व दर्शन, सकाळी ०७.०० वाजता श्रींची पाद्यपूजा, सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत श्री नाना वीर, शिर्डी यांचा साईभजन कार्यक्रम, दुपारी १२.३० वाजता श्रींची माध्यान्ह आरती, दुपारी ०१.०० ते दुपारी ०३.०० या वेळेत संजीव कुमार, पुणे यांचा भजनसंध्या कार्यक्रम, सायंकाळी ०४.०० ते ०६.०० या वेळेत ह.भ.प.श्री संतोष पित्रे, डोंबिवली यांचा कीर्तन कार्यक्रम होणार असून सायंकाळी ०७.०० वाजता श्रींची धूपारती होईल. ७.३० ते रात्रौ १०.०० यावेळेत श्री नीरज शर्मा, दिल्ली यांचा भजनसंध्याचा कार्यक्रम, रात्री ०९.१५ वाजता श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक निघणार आहे. हा उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी उघडे राहणार असून या दिवशी श्रींची शेजारती व दिनांक २२ जुलै रोजीची पहाटेचे श्रींची काकड आरती होणार नाही. या दिवशी रात्री १०.०० ते पहाटे ०५.०० वाजेपर्यत इच्छुक कलाकारांचे साईभजन (हजेरी) कार्यक्रम मंदिराशेजारील स्टेजवर होईल.

उत्सवाच्या सांगता दिनी सोमवार दिनांक २२ जुलै रोजी पहाटे ०५.०५ वाजता श्रींचे मंगलस्नान व दर्शन, सकाळी ०६.५० वाजता श्रींची पाद्यपूजा, सकाळी ०७.०० वाजता गुरुस्थान मंदिरात रुद्राभिषेक होणार आहे. सकाळी १०.०० ते १२.०० वाजता या वेळेत ह.भ.प.श्री वैभव ओक, डोंबिवली यांचा गोपालकाला कीर्तन व दहीहंडीचा कार्यक्रम होणार आहे.